

अफिफ जमिल शेख
सभापती
स्थायी समिती

मा. अध्यक्ष महोदय, व सन्मा. सभागृह,

वसई विरार शहर महानगरपालिकेचे हे सातवे अंदाजपत्रक सादर करण्याची संधी माझ्यासारख्या २४ वर्षाच्या एका तरुणाला आपले लोकनेते मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब यांनी दिली याबद्दल मी त्यांचा शत:श ऋणी आहे.

लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, व्दितीय महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब, व मा. प्रथम महिला महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करण्याची मला संधी मिळाली यात मी धन्यता मानतो. तसेच सद्याचे महापौर मा. श्री. रुपेशजी जाधव साहेब, व मा. उपमहापौर श्री. प्रकाशजी रॉड्रीग्ज साहेब यांच्या वेळोवेळीच्या सुचना लक्षात घेऊन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा सातवा व सभापती स्थायी समिती म्हणून माझे कार्यकाळातील पहिला व परिवहन उपक्रमाचा परिवहन समितीने तयार केलेला चौथा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला, याबद्दल मी त्यांचा व आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणीय लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, तत्कालीन खासदार बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, माजी महापौर व माजी उपमहापौर भुतपुर्व नगरपरिषदांचे माजी नगराध्यक्ष व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह दिलेल्या भेटीमध्ये मा. नाम. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, मा. खासदार स्वर्गीय श्री. चिंतामणजी वनगा साहेब, पालकमंत्री मा. नाम. श्री. विष्णुजी सावरा साहेब, विधानपरिषदेचे तत्कालीन उपसभापती स्वर्गीय मा. नाम. श्री वसंतरावजी डावखरे साहेब, तत्कालीन मुख्यमंत्री

मा. श्री पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. श्री. अजीतदादा पवार साहेब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त तसेच केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे सनदी अधिकारी यांचे वेळोवेळीचे मार्गदर्शन व सदिच्छा आपल्या पाठीशी सदैव राहील्या आहेत.

माझे पिताजी सन्माननीय श्री. जमिलजी शेख साहेब यांनी मला समाजसेवेचा जो वारसा दिला आहे त्याचाही मी हे अंदाजपत्रक सादर करताना आदरपूर्वक उल्लेख करीत आहे.

बहुजनांचा विचार करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच हा अर्थसंकल्प सादर करताना मा. प्रथम महिला महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम, माजी. उपमहापौर मा. श्री. उमेशजी नाईक साहेब, माजी. उपमहापौर श्री. सगिरजी डांगे साहेब, मा. सभागृह नेते श्री. फ्रँक डिसोझा साहेब, माजी. स्थायी समितीचे सभापती मा. श्री. जितेंद्रजी शहा साहेब, मा. श्री. नारायणजी मानकर साहेब, मा. श्री. अजीवजी पाटील साहेब, मा. श्री. संदेशजी जाधव साहेब, व मा. नितीनजी राऊत साहेब, यांचे नियमित व विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटून केलेल्या मौलीक सुचना या सर्वाचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात उमटले आहे. सर्व स्तरावरुन विकासाच्या सूचना प्राप्त व्हाव्यात म्हणून मी प्रत्येक स्थायी समिती समोर आजी - माजी पदाधिकारी शहरातील मान्यवर यांचेकडून सुचना मागविण्याचा नवीन उपक्रम सुरु केला आहे. त्यास भरघोस प्रतिसाद मिळत आहे. सर्व सन्मा. गटनेते सदस्य तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला असून त्याबाबीदेखील या अर्थसंकल्पात विचारात घेतल्या आहेत. महानगरपालिकेचे अंदाजपत्रक म्हणजे संकल्प व संकल्पपुर्तीचा लेखाजोखा असतो. त्या दृष्टीने अंदाजपत्रकासोबत दिलेल्या आकडेवारीवरुन गेल्या तीन वर्षात प्रत्यक्षात केलेली वाटचाल ही आपल्यासमोर या अंदाजपत्रकातील आकडेवारीवरुन येते. तसेच आगामी वर्षातील तरतुदीद्वारे आपण तयार केलेल्या विकास योजना अंदाजपत्रकाच्या रुपाने आपल्यासमोर येतात. सदर विकास कामे ही त्या त्या आर्थिक वर्षात पुर्ण करावयाचा मनोदय असतो.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या निर्वाचित सदनाचे हे सातवे अंदाजपत्रक आपणांसमोर सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे.

- महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या ठळक बाबी -

**मालमत्ता कर** :- महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करुन नव्याने कर आकारणी करणे आवश्यक आहे. बऱ्याच ठिकाणी व्यापारी - वाणिज्यिक - औद्योगिक गाळ्यांना निवासी दराने कर आकारणी करण्यात आली आहे त्याचा सर्व्हे होणे गरजेचे असुन मालमत्तेच्या प्रकारानुसार व क्षेत्रफळानुसार कर आकारणी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका हद्दीत समावेश झालेल्या ग्रामीण भागातील मालमत्तांच्या सामान्य करामध्ये अधिनियमातील तरतुदीप्रमाणे टप्प्या - टप्प्याने वाढ करुन तो समान पातळीवर आणणे अनिवार्य आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांचा सर्व्हे करुन त्यास शास्ती बसवून कर आकारणी करणे आवश्यक आहे. याकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व मालमत्तांचे जी.आय.एस. द्वारे सर्वेक्षण करण्यात आले असुन त्याद्वारे शहरातील सर्व मालमत्तांचे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुर्नमुल्यांकन केले जाणार असुन शासनाच्या नगररचना विभागाने दिलेल्या 'रेटेबल व्हॅल्यू' नुसार कर आकारणी करण्यात येणार आहे. मालमत्ता करापासून सन २०१८-१९ मध्ये रु. १५० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

**मालमत्ता कराबाबत महानगरपालिकेने प्रोत्साहनपर खालील विशेष तरतुदी केल्या आहेत.**

- आगामी वर्षात देखील ५ वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरण्याऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात १५% दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद केली आहे.
- स्वातंत्र सैनिक त्यांची विधवा पत्नी तसेच त्यांचे पुढील पहिल्या पिढीतील एका वारसाला त्याच्या राहत्या निवासी सदनिकेस त्याच्या वेळीवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात १०० % सुट आहे.
- आजी माजी सैनिक अथवा त्यांचे अवलंबीतास मागणीनुसार मालमत्ता करात ५० % सुट आहे.
- नव्याने बांधकाम परवानगी देताना विकासकांनी इमारतीमध्ये पाण्याच्या पुर्नवापर करणेसाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याचे बंधन घातले जात असून सद्यस्थितीतील जे मालमत्ता धारक पिण्याचा पाण्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुर्नवापर करण्याची योजना महानगरपालिकेच्या नगररचना

विभागाच्या संमतीने अंमलात आणतील त्यांना पाणी पट्टीच्या देयकात २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अनुदान स्वरुपात अदा करणेची तरतूद केली आहे.

- नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन हार्वेस्टींगची व्यवस्था झाली आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे व होत आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अनुदान स्वरुपात अदा करणेची तरतूद केली आहे.
- निसर्ग ऋण प्रकल्प राबविणेसाठी एकत्रित मालमत्ता कराच्या २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अनुदान स्वरुपात अदा करणेची तरतूद केली आहे.

**स्थानिक संस्था कर** :- स्थानिक संस्था कराची दाखल विवरणे कालबद्ध मर्यादेमध्ये तपासून घेऊन महानगरपालिकेची मागणी निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही होईल अशी अपेक्षा असून स्थानिक संस्था करापासून सन २०१८-१९ मध्ये रु. २० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

**पाणीपुरवठा सेवा**:- महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यांत आले असुन त्याद्वारे अनधिकृत नळजोडण्या शोधून काढून त्या नळजोडण्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या जोडण्या नियमीत करुन घेण्याची संधी ग्राहकाला देण्यात येईल ज्यामुळे महानगरपालिकेचे होणारे नुकसान बंद होऊन उत्पन्नात कायमस्वरुपी भर पडेल. पाणीपुरवठा सेवेपासून सन २०१८-१९ मध्ये रु. २०१ कोटी ३७ लक्ष ३५ हजार इतक्या उत्पन्न अपेक्षित आहे.

**<u>जाहिरात परवाना फी व जागा भाडे</u>** :- जाहिरात कर व जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेचे भाडे हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे जाहिरात धोरण ठरविणे आवश्यक होते. महानगरपालिकेच्या एकूण विस्तारित क्षेत्राचा विचार करता जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा मोक्याच्या ठिकाणी, अहमदाबाद हायवे, प्रमुख रस्ते, उद्याने, तलाव, पर्यटन स्थळे अशा जागांचे सर्वेक्षण करुन योग्य जागा जाहिरातीसाठी उपलब्ध करुन भाड्याने दिल्यास जाहिरात कर व जागेच्या भाड्यामधून बरेच उत्पन्न महानगरपालिकेला मिळू शकते याचा विचार करुन नविन जाहिरात धोरण ठरविण्यात आले आहे. जाहिरात करापासून सन २०१८-१९ मध्ये <u>रु. ९० लक्ष</u> उत्पन्न अपेक्षित आहे.

**<u>इमारत व गाळा भुईभाडे</u>** :- महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील भुईभाड्याने दिलेले गाळे, टपऱ्या, इमारतीमधील, मंडईमधील गाळे, दुकाने यांच्या भाडे दरात दर ३ वर्षांनी साचेबध्द भाडेवाढ करण्याबरोबरच महानगरपालिकेच्या इमारतीमधील सभागृह, सांस्कृतीक भवन, नाट्यगृह यांच्या दरात माफक भाडेवाढ करण्यात येणार आहे. इमारत व गाळा भुईभाडेपासून सन २०१८-१९ मध्ये <u>रु. ६१ लक्ष ५५ हजार</u> इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

**<u>अग्निशमन सेवा</u>** :- आचोळे येथील मुख्य अग्निशमन केंद्रात २० अत्याधुनिक अग्निशमन वाहने विविध उपकरणांनी सुसज्ज असून यात ४० मीटर उंच जाणाऱ्या शिडीचा (टर्न टेबल लॅडर) समावेश आहे. तसेच शहरातील दाटीवाटीच्या वस्त्या व अरुंद रस्ते असलेल्या ठिकाणी अग्निशमन करणे सुलभ जावे याकरीता अत्याधुनिक अग्निशमन उपकरणांनी सज्ज असलेल्या ७ मोटर सायकलचा ताफा अग्निशमन दलात समाविष्ट करण्यात आला आहे. महानगरपालिका क्षेत्रात अग्निशमन सेवा मोफत पुरविण्यात येत असली तरी मालमत्ताधारकांकडून सामान्य करासोबत अग्निशमन उपकर वसुल करण्यात येतो. इमारत बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून अग्निशमन सुरक्षा व विशेष अग्निसंरक्षण फी (कॅपिटेशन फी) आकारण्यात येते. श्रीप्रस्थ, (नालासोपारा) व सनसिटी, (दिवाणमान) येथे निर्माण केलेली २ अग्निशमन केंद्रे कार्यान्वित करण्यांत आली असून ६ नवीन अग्निशमन केंद्रे प्रस्तावित आहेत व त्यातील २ केंद्रांचे काम सुरु असून प्रगतीपथावर आहे

महानगरपालिका क्षेत्रात आता उंच इमारती बांधावयास परवानगी देण्यात येत असल्यामुळे या इमारतींच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने ७० मीटर उंच जाणारी स्वयंचलित शिडी असणारे अद्यावत अग्निशमन वाहन, दुरनियंत्रणाद्वारे अग्निशमन करण्याची क्षमता असलेले फायर वॉटर मॉनिटर उपकरण, कोणत्याही स्वरुपाच्या आपत्तीचा मुकाबला करण्यास उपयुक्त ठरणारी विविध साधने, उपकरणे, रसायने यांनी सुसज्ज असलेली हॅजमॅट व्हॅन घेण्याचे प्रस्तावित आहे. याकरता ५२ कोटी ३६ लक्ष ५० हजार रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

**आपत्ती व्यवस्थापन**:- महानगरपालिकेचा अद्यावत आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष निर्माण करण्यासाठी ५ कोटी ७९ लक्ष रुपयांची स्वतंत्र तरतुद करण्यात आली आहे.

**वैद्यकिय सेवा**:- कौलसिटी (वसई) येथे संपादीत जागेत २०० बेडचे अत्याधुनिक सुविधा असलेले ५० कोटी खर्चाचे मल्टीस्पेशालीटी रुग्णालय प्रस्तावित करण्यात येत असुन रुग्णालयाचे आराखडे इ. तांत्रिक तयारी करण्यासाठी रु. ५ कोटी प्राथमिक निधीची तरतुद करण्यात आली आहे. चंदनसार येथील नियोजीत रुग्णालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन अंतर्गत सजावट यासह रुग्णालयासाठी यंत्र सामुग्री व इतर साधने या शिर्षांतर्गत रु. ३ कोटी इतकी तरतुद आहे. वैद्यकिय सेवेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. ५० कोटी ३५ लक्ष १० हजार इतक्या खर्चाची तरतुद आहे.

त्याप्रमाणे आचोळे (नालासोपारा) येथे ३०० बेडचे अत्याधुनिक सुविधा असलेले ७५ कोटी खर्चाचे सर्वसाधारण रुग्णालय प्रस्तावित करण्यात येत असून रुग्णालयाचे आराखडे व इतर तांत्रिक बाबी पुर्ण करण्यासाठी रु. ५ कोटी प्राथमिक निधीची तरतुद करण्यात आली आहे. महानगरपालिका हद्दीतील शासकिय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन आवश्यकतेनुसार त्या - त्या जागी सुसज्ज रुग्णालये, दवाखाने निर्माण करुन वैद्यकिय सेवा अधिक दर्जेदार करण्यावर भर देण्यात येणार असून यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

**नाट्यगृह / सांस्कृतिक भवन** :- लक्ष्मीबेन छेडा मार्ग, नालासोपारा व मजेठिया पार्क, आचोळे येथील नाट्यगृहाचे व गोकुळ टाउनशिप, विरार येथील नवीन सांस्कृतीक भवनाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

**पाणीपुरवठा व्यवस्था** :- महानगरपालिका क्षेत्राला यापुर्वी सुर्या, उसगाव व पेल्हार या पाणीपुरवठा योजनांमधून प्रतिदिन १३० दश लक्ष लिटर्स पाणीपुरवठा होत होता. वाढती लोकसंख्या व पाण्याची मागणी लक्षात घेऊन सुर्या टप्पा ३ या १०० दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. पाण्याचा वाढीव कोटा मंजुरी व वनखात्याच्या अखत्यरीतील जमिनीमधून जलवाहिन्या आणण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी लागलेला वेळ यामुळे योजनेचे काम पुर्ण होण्यास विलंब लागला. आता शहरांतर्गत वितरण व्यवथा निर्माण करण्याचे काम सुरु असून टप्प्या - टप्प्याने नवीन जोडण्या देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. भविष्यातील पिण्याच्या पाण्याची मागणी पुरवण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वसई विरार व मिरा - भाईंदर क्षेत्रासाठी हाती घेतलेल्या ४०३ दश लक्ष लिटर्स क्षमतेच्या पाणीपुरवठा योजनेतून वसई - विरार महानगरपालिका क्षेत्राला १८५ दश लक्ष लिटर्स पाणी प्रतिदिन उपलब्ध होणार आहे.

देहरजा नदीवर आखण्यात आलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी महानगरपालिकेने शासनाच्या जलसंपदा विभागाकडे रु. १६७ कोटी तर सुसरी पाणीपुरवठा प्रकल्पासाठी रु. १६ कोटी जमा केले असून या योजना पुर्णत्वास गेल्यानंतर या योजनेतून वसई - विरार महानगरपालिकेस ४९० दशलक्ष लिटर्स पाणी प्रतिदिन उपलब्ध होणार आहे. या योजनांव्यतिरीक्त सुर्या नदीवर कवडास येथे ५ नवीन बंधारे बांधून पाणी साठ्यात वाढ करणे, पाणी वाया जावू नये यासाठी लोखंडी गेट बसवणे, राजावली - सातिवली, तिल्हेर, कामण, हत्तीपाडा येथे नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याच्या कामांचा पाठपुरावा सुरु असून सर्व्हेक्षण, चाचणी निष्कर्ष, संकल्पन या प्राथमिक कामासांठी रु. २ कोटी २० लक्ष रुपयांचा भरणा महानगरपालिकेने केला आहे. खोलसापाडा योजनेस नुकतीच शासनाकडून मंजुरी देण्यांत आली असुन या योजनेसाठी २ कोटी रुपयांची स्वतंत्र तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा सुधारणा कामे करणे कामी (GIS मॅपींग, कंझ्यूमर सर्व्हे, फ्लो मिटर बसविणे, हायड्रॉलीक मॉडेलींग इत्यादी कामांचा समावेश आहे.) रु. ७ कोटी ६८ लक्षच्या योजनेस शासनाची मान्यता प्राप्त असून यातून ७० % शासन अनुदान असुन आतार्यंत रु. ४ कोटी ८९ लक्ष प्राप्त झाले आहे. सदर योजना लवकरच पूर्ण होणे अपेक्षित असुन त्यानुसार प्राप्त होणाऱ्या अहवालाप्रमाणे सुधारणा कामे करणेत येणार आहेत.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानात वसई विरार शहर महानगरपालिकेचा समावेश झाल्यानंतर मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदर श्री क्षितीज ठाकूर व मा. आमदार श्री. विलास तरे यांच्या प्रयत्नाने महापालिकेसाठी १३० कोटीच्या अतिरिक्त पाणी पुरवठा योजनेस शासनाने मान्यता दिली. सदर योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात सुमारे ३०० कि.मी. विविध व्यासाच्या जलवाहिनी अंथरणे व २१ ठिकाणी जलकुंभ उभारणे याकामांचा समावेश आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. २३३ कोटी ९९ लक्ष ६४ हजार इतक्या खर्चाची तरतुद आहे.

**नाले/खोदाई सफाई -** पाण्याचा निचरा होऊन रस्त्यावर पाणी तुंबू नये याकरीता तसेच नाले सफाई करीता सन २०१८-१९ मध्ये रु. ५ कोटी ५० लक्ष तरतुद करणेत आली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन** :- शहर स्वच्छतेमधून निघणाऱ्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन  ही सर्वच शहरांना भेडसावणारी गंभीर समस्या असून घनकचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केल्यास या कचऱ्याचा काही भाग पुर्नप्रक्रियेसाठी वापरता येऊन उर्वरीत कचऱ्याची विल्हेवाट लावणे सोयीस्कर होईल यासाठी गृहनिर्माण संस्थांनी ओल्या कचऱ्यापासून खत निर्मीती करुन त्याचा वापर आपल्याच आवारात वृक्ष संवर्धनासाठी केल्यास ते पर्यावरणाच्या दृष्टीने देखील पोषकच ठरेल. नागरीकांनीही आपल्या घरातील पुर्नप्रक्रियेसाठी वापरता येण्याजोग्या वस्तू इतर कचऱ्याबरोबर न टाकता त्या भंगारात विकाव्यात किंवा कचरावेचक महिलांना द्याव्यात ज्यामुळे त्यांनाही अर्थार्जन होऊ शकेल. प्लास्टिक पिशव्यांच्या विक्री व वापरावर नियंत्रण आणून पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या व अनेक नागरी समस्या निर्माण होण्यास कारणीभूत असलेल्या प्लास्टिक पिशव्या व्यवहारातून हद्दपार करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून जनजागृतीसह दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे. घनकचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरुपी मार्ग काढण्यासाठी कचऱ्यापासून वीज निर्मीती सारख्या पर्यायांवर देखील लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

**रेल्वे उड्डाणपूल** :- नारींगी, विराट नगर, ओसवाल नगर, अलकापुरी, उमेळमान या ठिकाणी रेल्वेच्या पुर्व व पश्चिम बाजसू जोडणारे पुल प्रस्तावित असून यांचा तांत्रिक अहवाल आराखडे इत्यासाठी रु. २ कोटीची प्राथमिक तरतूद ठेवण्यात आली आहे.

<u>**शहरांतर्गत उड्डाणपूल**</u> :- शहरांतर्गत वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी माणिकपूर, पंचवटी नाका, चंदन नाका, लक्ष्मीबेन छेडा मार्ग, श्रीप्रस्थ, सेंट्रल पार्क, नारींगी नाका, बोळींज, फुलपाडा जंक्शन येथे उड्डाणपूल करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. शहरांतर्गत उड्डाणपूल व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये <u>रु. १२ कोटी २ लक्ष</u> रकमेची तरतुदी आहे.

<u>**परिवहन सेवा**</u> :- महानगरपालिकेची परिवहन सेवा BOOM (BUILD OWN OPERATE MAINTAIN) पद्धतीने भागीरथी ट्रान्सपोर्ट कंपनी चालवित असून या कंपनीच्या १६७ बसेस ही सेवा पुरवित असुन ४४ मार्गावर ही सेवा कार्यरत आहे. महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतून प्रवास करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना प्रवासी भाड्यामध्ये १०० टक्के, ज्येष्ठ नागरीकांना ५० टक्के, दिव्यांग व्यक्तींना ५० टक्के सुट देण्याचे धोरण महानगरपालिकेने स्विकारले असुन यासाठी होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यांत आली आहे. विरार येथे सद्या अद्यावत परिवहन भवन निर्माण करण्याचे काम सुरु आहे. परिवहन सेवेसाठी सन २०१८-१९ मध्ये <u>रु. ५८ कोटी ४२ लक्ष</u> इतक्या अंशदानाची तरतुद आहे.

<u>**उद्यान व्यवस्था**</u> :- २०१७-१८ या वर्षात ५ उद्यानांच्या सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले. त्यातील ३ कामे पुर्ण करण्यात आली असुन २ प्रगतीपथावर आहेत. २०१८-१९ या वर्षात १३ उद्यानांच्या सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित आहे. उद्यान व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये <u>रु. २६ कोटी २२ लक्ष ६६ हजार</u> इतक्या खर्चाची तरतुद आहे. नारींगी येथील देवगिरी प्रकल्पास नव्याने चालना देण्यांत येणार असून या ठिकाणी हँगिग गार्डनच्या धर्तीवर टेकडीचा विकास करण्यावर भर देण्यांत येणार असून या प्रकल्पामुळे शहराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे. त्याच प्रमाणे विकास आराखड्यातील उद्यानासाठी असलेल्या राखीव भुखंडावर बालोद्यान, नाना - नानी पार्क, बगीचे निर्माण करुन नागरीकांना विरंगुळ्याची सोय उपलब्ध करुन दिली जाईल.

**<u>तलाव व्यवस्था</u>** :- महानगरपालिकेच्या वाढत्या लोकसंख्येमुळे तलाव, नदी, सरोवर अशा नैसर्गिक घटकांवर पर्यावरणात्मकदृष्ट्या परिणाम होत असतो. तलावांचे अस्तित्व व नैसर्गिक सौदर्य राखले जावे, पर्यावरणाचा समतोल टिकण्यास मदत व्हावी यासाठी तलावांना मध्यमदर्शी ठेवून त्यांची अभ्यासपूर्ण पाहणी करुन नंतर सुशोभिकरणासाठीचे बांधकाम करण्यात येते. २०१७-१८ या वर्षात १४ तलावांचे सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले. त्यातील ४ तलावांच्या सुशोभिकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असून १० कामे प्रगतीपथावर आहेत. २०१८-१९ या वर्षात १३ तलावांच्या सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित आहे. निर्मळ येथील ऐतिहासिक विमल तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामासह तेथे वसईच्या ग्रामीण जीवन संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी ग्रामीण जीवन, विविध जाती धर्माचे स्थानिक लोक, त्यांचे राहणीमान, व्यवसाय, उद्योग, चालीरिती, रुढी परंपरा, सण, उत्सव, लग्न समारंभ, बारसे, मुंज, यावर आधारीत शिल्पांचे तसेच विविध समाजाच्या स्थानिक लोकांचे पेहराव, अलंकार, आभूषणे, हत्यारे, अवजारे, साधनसामुग्री, भांडीकुंडी इत्यादी वस्तूंचे कायमस्वरुपी संगहालय निर्माण करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला असून याच ठिकाणी वसईतील वृक्ष, झाडे, वेली, वनस्पती यांचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे. वसईच्या ग्रामीण जीवन संस्कृतीचे दर्शन घडविणारा हा प्रकल्प पर्यटकांच्या दृष्टीनेही निश्चितच आकर्षण राहील. तलाव व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये <u>रु. ४२ कोटी ५८ लक्ष १८ हजार</u> इतक्या खर्चाची तरतुद आहे.

**<u>मार्केट व्यवस्था</u>** :- सन २०१८-१९ या वर्षात २ मार्केट बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यातील १ मार्केट पुर्ण करण्यात आले असुन १ प्रगतीपथावर आहे. सन २०१८-१९ या वर्षात २ मार्केट बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. मार्केट व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये <u>रु. ७ कोटी ३० लक्ष २५ हजार</u> इतक्या खर्चाची तरतुद आहे.

**<u>सार्वजनिक स्वच्छतागृहे</u>** :- (सन २०१७-१८ या वर्षात पे अँड युज तत्वावरील १६ स्वच्छतागृहांचे काम पुर्ण करण्यांत आले आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत १०६०७ वैयक्तिक व ४५ सामुदायिक शौचालये बांधण्यात आली आहेत.) <u>नैसर्गिक विधीचा अधिकार (Right to Pee)</u> - अनेक महिला नोकरीनिमित्त किंवा काही कामानिमित्त घराबाहेर पडत असतात. पण आजवर या स्त्रियांनी एका नाजूक अडचणीबद्दल कधीही नि:संकोचपणे सांगण्याचा प्रयत्न केलेला नाही ती म्हणजे घराबाहेर पडल्यानंतर नैसर्गिक विधीसाठी जाण्यासाठी स्वच्छ सुरक्षित आणि सहज उपलब्ध असतील अशा मुताऱ्या लघुशंकेसाठी घराबाहेर असताना दैनंदिन गरजेच्या वेळी आणि विशेषत:

मासिक पाळीच्या काळात स्त्रियांना सुरक्षित आणि स्वच्छ परिस्थितीत लघुशंकेचा हक्क मिळावा याकरीता महिलांसाठी स्वच्छ, सुरक्षित सार्वजनिक मुताऱ्या उपलब्ध करुन देण्याबरोबरच वयस्कर, विशेषत: दिव्यांग व वृध्द पुरुषांचीदेखील लघुशंकेसाठी होणारी गैरसोय दुर करण्यासाठी सार्वजनिक मुताऱ्या उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. सार्वजनिक स्वच्छता गृह व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी इतक्या खर्चाची तरतुद करण्यात आली आहे.

**दहन व दफनभुमी व्यवस्था** :- सन २०१७-१८ या वर्षात स्मशानभुमीच्या सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले त्यातील ६ कामे पुर्ण करण्यात आली असुन २ कामे प्रगतीपथावर आहेत. २०१८-१९ या वर्षात १० स्मशानभुमींच्या व २ दफनभुमींच्या सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित आहे. दहन व दफनभुमी व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. १७ कोटी ८ लक्ष ३६ हजार इतक्या खर्चाची तरतुद आहे.

**वाचनालय व्यवस्था** :- चांगले साहित्य लोकांपर्यंत पोहोचवायचे असेल तर ग्रंथालय आणि माध्यमांना लोकांपर्यंत जावे लागेल व ही काळाची गरज आहे. म्हणूनच वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी सर्वांनी पुढे येणे हि बाब आज अतिशय निकडीची झाली आहे. याकरीता महानगरपालिका हद्दीतील साहित्यिकांच्या पुस्तकांची खरेदी करुन ती सार्वजनिक वाचनालये व शैक्षणिक संस्थांच्या वाचनालयांना वाटणे, पुस्तके व ग्रंथ प्रदर्शने यांचे आयोजन करणाऱ्या संस्थांना मदत करणे यासारखे निर्णय घेण्यांत आले आहेत. महानगरपालिकेने ज्येष्ठ नागरीकांना काही सेवा व सवलती देण्याचा निर्णय घेतला असुन त्यानुसार वाचन संस्कृती जोपासण्यासाठी महानगरपालिकेकडून ज्या सार्वजनिक वाचनालये / ग्रंथालयांना वार्षिक अनुदान देण्यांत येते त्यांनी ज्येष्ठ नागरीकांना वाचनालय / ग्रंथालयाची सेवा विनाशुल्क उपलब्ध करुन दिल्यास त्यांना या सेवेबद्दल प्रतीपुर्ती म्हणून पुढीलप्रमाणे सुधारीत दराने वार्षिक सहाय्यक अनुदान देण्याची तरतुद करण्यात आली आहे. अ वर्ग रु. १,५०,०००/-, ब वर्ग रु. १,००,०००/-, क वर्ग रु. ७५,०००/-, ड वर्ग रु. ५०,०००/- वाचनालय व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. ७५ लक्ष ७ हजार इतक्या खर्चाची तरतुद आहे.

**सांस्कृतीक भवन व्यवस्था** :- सन २०१७-१८ या वर्षांत ५ समाज मंदिर बांधण्याचे काम हाती घेण्यात आले होते. त्यातील ४ कामे पुर्ण करण्यात आली असुन १ काम प्रगतीपथावर आहे. सन २०१८-१९ या वर्षांत ३ समाज मंदिर बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. सांस्कृतीक भवन व्यवस्थेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. ४५ लक्ष ३५ हजार इतकी तरतुद आहे.

**बांधकाम व्यवस्था**:-

**नविन प्रशासकीय इमारत:**- विरार येथील महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन झाले असून या प्रशस्त इमारतीमध्ये मुख्य सभागृह, महापौर दालन, सर्व समित्यांसाठी सभागृहे, सभापती दालने, विरोधी पक्ष नेता दालन, सर्व विभागाची कार्यालये, पत्रकार कक्ष, सर्व पक्षांसाठी कार्यालये कॉन्फरन्स हॉल इत्यादीसोबत सेंन्ट्रल लायब्ररी, टाऊन हॉल,आर्ट गॅलरी, प्लॅनिटोरियम या सारख्या सुविधा पुरविण्यात येणार असुन यासाठी रु.१० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

**रात्र निवारा केंद्र** :- राष्ट्रीय शहरी उपजिविका मिशन योजनेनुसार रात्र निवारा केंद्र बनविण्याची आवश्यता असुन शहरातील बेघरांसाठी मोरे, (नालासोपारा) व वालिव या ठिकाणी रात्र निवारा केंद्राचे बांधकाम सुरु आहे. सन २०१८-१९ मध्ये रु. ४ कोटी तरतुद करण्यात आली आहे.

**सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रम** -

❖ आंतर शालेय कलाक्रिडा महोत्सव सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी तरतुद करणेत आली आहे.

❖ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृती परिक्षा तसेच राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय परिक्षा व स्पर्धा परिक्षा मधील यशस्वी विद्यार्थीचा गुणगौरव करण्यास सन २०१८-१९ मध्ये रु. ५ लक्ष तरतुद करणेत आली आहे.

- खेळ व संघ दत्तक घेणेसह विविध स्पर्धांसाठी खेळ व संघांचे प्रायोजकत्व स्विकारणे तसेच संघाना व खेळाडुना व्यक्तीगत अर्थसहाय्य देण्यासाठी रु. १ कोटी तरतुद करणेत आली आहे.
- युवकांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम, वाचनमाला व स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन, खुल्या प्रवर्गातील दहावी व बारावीमधील गुणानुक्रमे प्रथम दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पारितोषिक, महिला बाल कल्याण समितीमार्फत शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप तसेच महिला बाल कल्याण समितीमार्फत सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वर पक्षास अनुदान व इतर युवक कल्याणाच्या योजना सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी तरतुद करणेत आली आहे.
- तृतीय पंथीय व्यक्तींच्या कल्याणासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. २५ लक्ष तरतुद करणेत आली आहे.
- महापौर सहाय्यता निधी सन २०१८-१९ मध्ये रु. ५० लक्ष तरतुद करणेत आली आहे.

**दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना** :- अंध, दिव्यांग, मुक, कर्णबधिर मुला / मुलींना शैक्षणिक अर्थसहाय्य, अंध किंवा दिव्यांग मुलींच्या विवाहासाठी व ज्यांचे आई आणि वडील दोन्हीही अंध किंवा दिव्यांग आहेत अशा मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, ४५% ते ७५% या दरम्यान अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या महिलांना स्वयंराजगारासाठी बीज भांडवल म्हणून अर्थसहाय्य, व्यवसायिक प्रशिक्षण पुर्ण केलेल्या गतिमंद / मतिमंद मुला/मुलींना, अंध / दिव्यांग व्यक्तींना स्वयंराजगार निर्मीती म्हणून व्यवसाय करण्यासाठी स्वयंरोजगार सहाय्यता अनुदान, गतिमंद / मतिमंद मुले किंवा मुली अथवा विशेष बालक यांच्या देखभालीसाठी विशेष संगोपन भत्ता, ७५% किंवा त्याहून अधिक अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनींना विशेष शैक्षणिक भत्ता, कुटूंबातील ७५% किंवा त्याहून अधिक अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या मुलीस / महिलेस विशेष सुसह्य भत्ता. या कल्याणकारी योजना राबविणेसाठी अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतुदी केल्या आहेत.

- दिव्यांग व विशेष व्यक्तींकरीता कल्याणकारी योजना राबविण्याऱ्या संस्थाना वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. ४ कोटी इतकी तरतुद केली आहे.
- दिव्यांग मुलीच्या लग्नासाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. २५ लक्ष तरतुद केली आहे.

- ज्या मुलीचे आई - वडील दिव्यांग आहेत त्यांच्या लग्नासाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. २५ लक्ष तरतुद केली आहे.
- विशेष मुलांसाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत वितरीत करावयाचे योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. ७० लक्ष तरतुद केली आहे.
- कुटुंब प्रमुख ७५% अथवा त्याहून अधिक दिव्यांग असल्यास महिला बाल कल्याण समितीमार्फत महिलांना द्यावयाचे योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. ३० लक्ष तरतुद केली आहे.
- दिव्यांग, कर्णबधीर व मुकबधीर विद्यार्थ्यांना महिला बाल कल्याण समितीमार्फत शैक्षणिक योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. २५ लक्ष तरतुद केली आहे.
- दिव्यांग व विशेष व्यक्तींकरिता कल्याणकारी योजनेंतर्गत भांडवली कामे याअंतर्गत सन २०१८-१९ मध्ये रु. ८७ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

**महिला बाल कल्याण कार्यक्रम** :- विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या मुला / मुलींना व ज्या महिलेचा पती व्याधीग्रस्त असुन अंथरुणास खिळलेला आहे अशा कुटुंबातील मुला / मुलींना शैक्षणिक अर्थसहाय्य, विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या मुलीला विशेष प्रोत्साहनपर शैक्षणिक अर्थसहाय्य, विधवा घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, विधवा / निराधार / परितक्त्या / घटस्फोटीत असणाऱ्या महिलांना किरकोळ स्वरुपाचा व्यवसाय करण्यासाठी बीज भांडवल म्हणून अनुदान, वयाची ६० वर्षे पुर्ण झालेल्या एकाकी व हलाकीचे जीवन जगणाऱ्या महिलेस उदरनिर्वाह भत्ता, दारिद्रेरेषेखालील / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कर्करोग झालेल्या महिलेस वैद्यकिय उपचार करण्यासाठी मदत, दारिद्ररेषेखालील / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलेस बाळंत होण्यापुर्वी ६ महिने आधिपासून व बाळंत झाल्यापासून ६ महिने पर्यंत दुध पिण्यासाठी पोषण आहारभत्ता.

**<u>ज्ञानसाधना योजना</u>** :- मागासवर्गीय कुटुंबातील मुलीस परदेशातील विद्यापिठात उच्च शिक्षणासाठी रु १०००००/- विशेष प्रोत्साहनपर शैक्षणिक अर्थसहाय्य, शासकिय आय.टी.आय. मध्ये १ वर्षाहून अधिक कालावधी असलेल्या तांत्रिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे अशा मागासवर्गीय मुलीला व ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. १०००००/- किंवा त्याहून कमी आहे अशा विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या मुलीला ज्ञानसाधना योजनेतर्गत रु. ५०००/- वार्षिक विशेष प्रोत्साहनपर शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>वरदायिनी योजना</u>** :- मागासवर्गीय समाजातील विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या २ मुलींच्या विवाहासाठी, ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. १०००००/- किंवा त्याहून कमी आहे अशा विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या २ मुलींच्या विवाहासाठी, कुटूंबातील अंध किंवा दिव्यांग असलेल्या २ मुलींच्या विवाहासाठी, ज्यांचे आई आणि वडील दोन्हीही अंध किंवा दिव्यांग आहेत अशा २ मुलींच्या विवाहासाठी वरदायिनी योजनेतर्गत रु. २५०००/- प्रत्येकी अर्थसहाय्य देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>श्रम साधना योजना</u>** :- कुटूंबातील ४५% ते ७५% या दरम्यान अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या २ महिलांना स्वयंराजगारासाठी बीज भांडवल म्हणून रु. १००००/-, मागासवर्गीय तसेच इतर समाजातील विधवा/निराधार/परितक्त्या/घटस्फोटीत असणाऱ्या महिलांना किरकोळ स्वरुपाचा व्यवसाय करण्यासाठी बीज भांडवल म्हणून रु. ५०००/- श्रम साधना योजनेतर्गत एकदाच अनुदान देण्याची तरतुद करण्यांत आली आहे.

**<u>उद्यम साधना योजना</u>** :- कुटूंबातील व्यवसायिक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गतिमंद / मतिमंद मुला / मुलींना, अंध / दिव्यांग व्यक्तींना, दारिद्र्यरेषेखालील/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींना स्वयंराजगार निर्मिती म्हणून व्यवसाय करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेने कर्ज मंजूर केले आहे. अशा मंजूर केलेल्या कर्ज रकमेच्या ५०% किंवा अधिकतम रु. १०००००/- उद्यम साधना योजनेतर्गत स्वयंराजगार सहाय्यता अनुदान म्हणून देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>आधारमाया योजना</u>** :- कुष्ठरोगाने बाधित व्यक्ती जीच्या जवळ उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही अशा व्यक्तीस, वयाची ६० वेर्षे पुर्ण झालेल्या एकाकी व हलाखीचे जीवन जगणाऱ्या महिलेस दरमहा रु. ३०००/- उदरनिर्वाह भता आधारमाया योजनेंतर्गत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>जिवनदायिनी योजना</u>** :- दारिद्रयरेषेखालील/आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कर्करोग झालेल्या महिलेस वैद्यकिय उपचार करण्यासाठी रु. २५०००/- आर्थिकदृष्टया परवडणारे नाही अशा व्यक्तीस नियमित डायलिसीस करुन घेण्यासाठी प्रती डायलिसीस रु. ३५०/- जिवनदायिनी योजनेंतर्गत विशेष वैद्यकिय उपचारासाठी अर्थसहाय्य देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>उत्तरदायी योजना</u>** :- कुटूंबातील गतिमंद/मतिमंद मुले किंवा मुली अथवा विशेष बालक यांच्या देखभालीसाठी दरमहा रु. १०००/- विशेष संगोपन भत्ता उत्तरदायी योजनेंतर्गत देयण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>ज्ञानमयी योजना</u>** :- कुटूंबातील ७५% किंवा त्याहून अधिक अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना दरमहा रु. १०००/- विशेष शैक्षणिक भत्ता ज्ञानमयी योजनेंतर्गत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>सुखदायी योजना</u>** :- कुटूंबातील ७५% किंवा त्याहून अधिक अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या मुलीस/महिलेस दरमहा रु. १०००/- विशेष सुसहयता भता सुखदायी योजनेंतर्गत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>आरोग्यदायी योजना</u>** :- दारिद्रयरेषेखालील/आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलेस बाळंत होण्याच्या ६ महिने आधीपासून व बाळंत झाल्यापासून ६ महिने नंतर पर्यंत दुध पिण्यासाठी दरमहा रु.६००/-पोषण आहारभत्ता आरोग्यदायी योजनेंतर्गत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>दत्तक पालकत्व योजना</u>** :- निपुत्रिक पालकांनी कायदेशिर मार्गाने अनाथ /निराधार मुलगा किंवा मुलगी दत्तक घेतल्यास अशा पालकांना रु. २५०००/- तर सपुत्रिक पालकांनी कायदेशीर मार्गाने अनाथ/निराधार मुलगी दत्तक घेतल्यास अशा पालकांना रु. ५००००/- प्रोत्साहनपर पालकत्व अनुदान दत्तक पालकत्व योजनेंतर्गत देण्याची तरतुद करण्यांत आली आहे.

**<u>मागासवर्गीय कल्याणकारी योजना</u>** :- मागासवर्गीय समाजातील विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या मुला / मुलींना शैक्षणिक सहाय्य, मागासवर्गीय समाजातील विधवा, निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या मुलीस विवाहासाठी सहाय्य, मागासवर्गीय मुलीस परदेशातील विद्यापिठात उच्च शिक्षणासाठी व तंत्रशिक्षणासाठी शैक्षणिक सहाय्य, मागासवर्गीय समाजातील विधवा / निराधार / परितक्त्या / घटस्फोटीत असणाऱ्या महिलांना किरकोळ स्वरुपाचा व्यवसाय करण्यासाठी बीज भांडवल अनुदान.

महिला व बालकल्याणच्या माध्यमातून या योजनांव्यतिरीक्त महिला व मुलींसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी वर्षातून तीन वेळा विविध ठिकाणी बाजारपेठांचे आयोजन केले जाते. त्यातील मार्केटींग, पॅकेजिंग, सेल्स यासाठी 'घे भरारी' सारख्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

महिला बचत गटांची स्थापना करुन त्यांचे दिनदयाळ अंत्योदय योजनेअंतर्गत वस्तीस्तर बनवले गेले ज्यांच्या माध्यमातून महानगरपालिका हद्दीतील उद्याने संवर्धन तसेच स्वच्छ भारत अभियान, ओला कचरा - सुका कचरा याबाबत जनजागृती करणे- प्लास्टिक विरोधी जनजागृतीमध्ये जुन्या साड्या कपड्यांच्या माध्यमातून कापडी पिशव्या महिला बचत गटाने बनवून देणे इ. समाजपयोगी कामे केली जातात. दरवर्षी बालमेळाव्याचे आयोजन केले जाते. सुट्टीतील संस्कार व कला याबाबत शिबीरातून मुलांच्या जडणघडणीत शालेय अभ्यासक्रमाव्यतिरीक्त कौशल्ये समृध्द करण्याचे काम केले जाते.

समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील जि. प. शाळा, अंगणवाडी यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप केले जाते. त्यासाठी आरोग्य शिबीरे घेतली जातात. दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना राबवली जाते. त्याचप्रमाणे शाळेपासून २.५ कि.मी. हून जास्त अंतरावर राहणाऱ्या ८ वी ते १० तील विद्यार्थ्यांना सायकल वाटप केले जाते. सामुदायीक विवाहा अंतर्गत ज्यांनी विवाह केले आहेत अशा वधू व वरास अनुदान दिले जाते.

महिलांच्या उद्योजकांसाठी कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच जेष्ठ नागरीकांसाठी डे केअर सेंटर बनविणे विचाराधीन आहे. महिला बचत गटांनी विविध उद्यानांत गांडूळ खत निर्मीती हा एक चांगला उपक्रम राबविला आहे.

वरील कार्यक्रमासाठी अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतूदी केल्या आहेत.

- ❖ विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना सन २०१८-१९ मध्ये रु. ३ कोटी ५० लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ महिलांना डायलेसिस उपचार करण्यांकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. ७५ लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ विधवा महिलांच्या मुलीच्या लग्नासाठी अनुदान सन २०१८-१९ मध्ये रु. ३० लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ विधवा महिलांच्या मुली / मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य / इयत्ता १ ते ४ थी च्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य / इतर पदव्युतर शिक्षणाकरीता महिलांसाठी अनुदान सन २०१८-१९ मध्ये रु. १ कोटी ५० लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ एकाकी जेष्ठ महिला / पुरुषांच्या उपजिवीकेकरीता अनुदान सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी २५ लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ शालेय विद्यार्थी व अंगणवाडीतील मुलांसाठी साहित्य वाटप सन २०१८-१९ मध्ये रु. ३ कोटी तरतुद केली आहे.
- ❖ शालेय मुलांसाठी मोफत सायकल योजना सन २०१८-१९ मध्ये रु. ७५ लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ स्त्री चिकित्सा शिबीर, कुष्ठरोग बाधित निराधार महिला व मुलींना महिला बालकल्याण समिती मार्फत उपचार व पोषण भत्ता यासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. २० लक्ष तरतुद आहे.
- ❖ नवजात रुग्ण बालकांस आवश्यक सुविधा पुरविणेसाठी अर्थसहाय्य सन २०१८-१९ मध्ये रु. ३० लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ सॅनीटरी नॅपकीन विनामुल्य देण्यासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. ४० लक्ष इतकी तरतुद केलेली आहे.

**<u>आर्थिक दुर्बल घटकांसाठी -</u>**

- ❖ महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार तथा पोषण भत्ता यासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. १ कोटी ५० लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ प्रधानमंत्री आवास योजना अथवा त्या धर्तीवर अन्य योजना कामासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. ४ कोटी १ लक्ष तरतुद करणेत आली आहे.
- ❖ मागासवर्गीय कल्याणकारी राखीव तरतुदी अंतर्गत रस्ता, गटार व इतर विकास कामे करण्याकरीता सन २०१८-१९ मध्ये रु. २० कोटी ९० लक्ष तरतुद करणेत आली आहे.
- ❖ आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना खाजगी नविन विहिरी खोदकामासाठी अनुदान सन २०१८-१९ मध्ये रु. १० लक्ष तरतुद केली आहे.
- ❖ आर्थिक दुर्बल घटकातील शेतकऱ्यांसाठी कृषी साहित्य विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके बियाणे, खत इ. साठी सन २०१८-१९ मध्ये रु. ५ कोटी तरतुद केली आहे.
- ❖ मच्छिमार व बोटीवरील मजुरांसाठी कल्याणकारी योजना रु. २ कोटी तरतुद करणेत आली आहे.

**<u>क्रीडा विषयक कार्यक्रम</u>** : - २०१७-१८ या वर्षांत ३ क्रीडांगणे विकसीत करण्याचे काम हाती घेण्यात आले त्यातील १ क्रीडांगण पुर्ण करण्यात आले असुन २ क्रीडांगण पुर्ण करण्यात आले असुन २ क्रीडांगणांची कामे प्रगतीपथावर आहेत. ताम तलाव, वसई येथील तरणतलावाचे काम प्रगतीपथावर आहे. २०१७-१८ या वर्षात विरार येथील म्हाडा वसाहती नजिक भव्य क्रीडा संकुलाचे भूमिपूजन झाले असुन या संकुलात ऑलिंपिक साईज तरण तलाव, ४०० मीटरचा सिंथेटीक रनिंग ट्रॅक, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, हातोडाफेक, फुटबॉल इत्यादी खेळांच्या सुविधांसह बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबलटेनिस या खेळांबरोबर मार्शल आर्ट, योगाभ्यास यासाठी इनडोअर सुविधा असणार आहे. जीवदानी पायथ्याजवळ क्रिकेटसाठी इनडोअर ॲकॅडमी बांधण्याचे काम प्रस्तावित आहे.

**क्रीडा साधना योजना** :- भारतीय खेळ प्राधिकरणाने खेळाडू व्यक्तीची प्रशिक्षणासाठी निवड केल्यास अशा खेळाडूला प्रशिक्षण कालावधीसाठी दरमहा रु. ६०००/- प्रशिक्षण भत्ता क्रीडा साधना योजनेंतर्गत देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

**क्रीडा संजीवनी योजना** :- जागतीक ऑलिंपिक संघटना, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या देशातील अधिकृत राष्ट्रीय क्रीडा संघटना व राज्य क्रीडा संघटनांनी आयोजित केलेल्या स्पर्धामधील सुवर्ण, रौप्य व कास्य पदके मिळविणाऱ्या स्पर्धकांना खालीलप्रमाणे पारितोषिके देऊन तसेच स्पर्धेमध्ये सहाभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणाऱ्या स्पर्धकाला प्रोस्ताहनपर अनुदान देऊन क्रीडा संजीवनी योजनेंतर्गत त्यांचा गौरव करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

राज्य अजिंक्यपदाच्या स्पर्धा :- सुवर्ण : रु. ५०,०००/-, रौप्य : रु. ४०,०००/-, कांस्य : रु. ३०,०००/-

राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या स्पर्धा:- सुवर्ण : रु. १,००,०००/-, रौप्य : रु. ८०,०००/-, कांस्य : रु. ६०,०००/-

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा : - सुवर्ण : रु. ५०,०००/-, रौप्य : रु. ४०,०००/-, कांस्य : रु. ३०,०००/-

ऑलिंपिक, जागतीक, राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा स्पर्धा व्यतिरीक्त अन्य अधिकृत आंतराष्ट्रीय स्पर्धा:- सुवर्ण : रु.२०००००/-, रौप्य : रु. १५००००/-, कांस्य : रु. १०००००/-

ऑलिंपिक :- सुवर्ण : रु. १,००,००,०००/-, रौप्य : रु. ७५,००,०००/-, कांस्य : रु. ५०,००,०००/-

जागतीक क्रीडा स्पर्धा :- सुवर्ण : रु. ७५,००,०००/-, रौप्य : रु. ५०,००,०००/-, कांस्य : रु. २५,००,०००/-

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा:- सुवर्ण : रु. ५०,००,०००/-, रौप्य : रु. ३०,००,०००/-, कांस्य : रु. २०,००,०००/-

आशियाई क्रीडा स्पर्धा :- सुवर्ण : रु. २५,००,०००/-, रौप्य : रु. २०,००,०००/-, कांस्य : रु. १५,००,०००/-

जागतीक ऑलिंपिक संघटना, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय व राज्य क्रीडा संघटनांच्या सहभागाशिवाय आयोजित करण्यात आलेल्या राज्य स्तरावरील, राष्ट्रीय स्तरावरील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा :-

राज्य स्तरावरील स्पर्धा :- सुवर्ण : रु. २५,०००/-, रौप्य : रु. २०,०००/-, कांस्य : रु. १५,०००/-

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा :- सुवर्ण : रु. ५०,०००/-, रौप्य : रु. ४०,०००/-, कांस्य : रु. ३०,०००/-

आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा :- सुवर्ण : रु. १,००,०००/-, रौप्य : रु. ८०,०००/-, कांस्य : रु. ६०,०००/-

**विविध संस्थांना विशेष योजनांतर्गत सहाय्य:-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वृद्धाश्रम, महिलाश्रम, अनाथालये चालविणाऱ्या संस्था, ज्येष्ठ नागरीकांच्या संस्था, महिलांच्या संस्था, शैक्षणिक संस्था, क्रीडा संस्था, क्रीडा प्रशिक्षण संस्था, सार्वजनिक व्यायामशाळा, नाट्य संस्था, महिलांच्या सहकारी संस्था व बचत गट, हस्तकला, चित्रकला व तत्सम कलाकृती शिकवणाऱ्य संस्था, संगीत, नृत्य, अभिनय इत्यादी शिकवणाऱ्या संस्था, साहित्यिक चळवळी चालवणाऱ्या संस्था, अंध, दिव्यांग, मुक, कर्णबधीर वा शारीरिक विकलांगासाठी काम करणाऱ्या संस्था, रुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्था, कुष्ठरोग्यासाठी काम करणाऱ्या संस्था, सामुदायिक विवाह समारंभ आयोजित करणाऱ्या संस्था, सामाजिक उद्दीष्ट्ये असलेल्या अन्य सेवाभावी व विश्वस्त संस्था यांना त्यांच्या कार्याच्या अनुषंगाने अनुदान देयाचे धोरण असुन अनुदानाची मागणी करणाऱ्या संस्थेचे कार्य व संस्थेची जनमानसात असलेली प्रतिमा लक्षात घेऊन तांत्रिक बाबी पुर्ण करणाऱ्या संस्थेला निधीच्या उपलब्धतेनुसार महानगरपालिकेकडून अनुदान मंजुर करण्यात येईल. अनुदान रोख रक्कम, वस्तू किंवा साहित्य या स्वरुपात देण्याची तरतुद करण्यात आली आहे. विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय तसेच निराधार व निराश्रीत मुलींसाठी कार्य करणाऱ्या संस्था, ग्रंथालये व इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थाना अनुदानासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी २५ लक्ष तरतुद केली आहे.

महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे व वसई विरार महानगरपालिका हद्दित किमान ३ वर्षे वास्तव्य असणाऱ्या अंध,दिव्यांग व अन्य शारिरिक व्याधीग्रस्त, अनाथ , निराश्रित, विधवा, निराधार, परितक्त्या, घटस्फोटीत महिला, जेष्ठ नागरीक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, मागासवर्गीय, दारिद्र्यरेषेखलील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल यासारख्या समाजातील विविध घटकांसाठी कल्याणकारी योजना.

**<u>विद्यावर्धिनी योजना</u>** :- १) कुटुंबातील अंध, दिव्यांग, मुक कर्णबधिर अशा २ मुलांना.

२) ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. १०००००/- किंवा त्याहून कमी आहे अशा विधवा निराधार, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या २ मुलांना.

३) मागासवर्गीय समाजातील विधवा, निराधार परितक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या २ मुलांना.

४) कुटुंबातील महिलेचा पती व्याधीग्रस्त असून अंथरुणास खिळलेला आहे व कुटूंबास उदरनिर्वाहाचे अन्य कोणतेही साधन नाही अशा कुटूंबातील २ मुलांना

५) अनाथ/निराधार बालक किंवा बालिका शिक्षण घेत असल्यास त्यांना शिक्षणासाठी विद्यावर्धिनी योजनेतर्गत प्रतिवर्षी रु. ३०००/- ते रु.२५०००/- प्रमाणे शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**<u>गणेशमुर्तीचे विसर्जन</u>** :- वसई तालुक्यात मोठया प्रमाणात सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होतो. दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाची संख्या वाढत आहे. हजारो घरगुती गणेश मुर्ती व सार्वजनिक गणेश मुर्तींची प्रतिष्ठापना होते. या सर्व मुर्तींचे विसर्जन शहरातील तलावांमध्ये होते. त्यामुळे तलावातील पाणी प्रदुषित होते. तलावातील पाण्याचे होणारे प्रदुषण टाळण्यासाठी गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यासाठी कुंड निर्माण करुन त्यात गणेश मुर्तीचे विसर्जन करण्याबाबत जनजागृती करण्यांत येणार आहे.

**<u>सांडपाणी प्रक्रिया</u>** : शहर सुधारणेच्या अनेक योजनांमध्ये सांडपाण्यावरील प्रक्रिया प्राधान्यक्रमाने असावयास पाहिजे. साधारणपणे दररोज एक व्यक्ती ६ ते ८० लिटर पाणी वाया घालवित असते. हे पाणी एकत्र करुन त्यावर योग्य प्रक्रिया केल्यास त्याचा पुनर्वापर होऊ शकतो. त्यामुळे पाणी टंचाई व जल प्रदुषण असे दोन्ही प्रश्न सुटू शकतात. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पावसाळी पाण्याचे संकलन, विहिरी व कुपनलिकांचे पुनर्भरण, जुने जलस्त्रोत, विहिरी, बावखले व कुपनलिकांचे पुनरुज्जीवन हे भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रभावी उपाय ठरु शकतील. यासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पावसाळी पाण्याचे संकलन, विहिरी व कुपनलिकांचे पुनर्भरण करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना आखण्यात येईल.

**<u>वृक्ष संवर्धन</u>** : वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. या करता पर्यावरण रक्षणासाठी उपयोग होईल अशी भारतीय प्रजातीमधील आंबा, आवळा, चिंच, फणस, वड, बेल, पिंपळ, उंबर, कडूनिंब, करंज, पळस, मोह, कदंब यासारख्या झाडांची वृक्षरोपणासाठी निवड करण्यांत आली पाहिजे कारण अशा वृक्षांच्या लागवडीमुळे पशुपक्ष्यांची निवाऱ्या बरोबर अन्नाची देखील सोय होते व पर्यावरण रक्षणाचा उद्देशही सफल होतो. शासनाने येणाऱ्या ३ वर्षात ५० कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवले असून सन २०१७ मध्ये ४ कोटी, २०१८ मध्ये १३ कोटी, २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्ष लागवड करण्यांत येणार असून हे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाकरिता महाराष्ट्र हरित सेना ही संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र हरित सेनेत समाजातील सर्व स्तरातील घटक जोडणे गरजेचे असून त्याकरिता ऑनलाईन सुविधा कार्यान्वित करण्यांत येत आहे. जेणेकरुन लोकसहभाग व सहयोग घेणे सुनिश्चित करता येईल. वृक्ष संवर्धनाच्या माध्यमातून नागरीकांमध्ये पर्यावरणाबद्दल रुची वाढावी यासाठी महानगरापालिकेने नक्षत्र उद्यान, वनस्पती उद्यान, निसर्ग उद्यान, रोपवाटीका विकसित करणे. वृक्षरोपणासह वृक्ष संवर्धनाचा कालबध्द कार्यक्रम आखणे, प्रतिवर्षी विविध झाडे, फुले, भाजीपाला यांचे प्रदर्शन भरविणे. बाग, बगीचा, परसबाग, उद्याने, टेरेस गार्डन राखणाऱ्या व्यक्तीस व संस्था यांच्यासाठी प्रोत्साहनपर स्पर्धा घेणे यासारखे उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेने शिरगांव येथे मानवनिर्मित जंगल तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी ५० हेक्टर याप्रमाणे सात वर्षात ३५० हेक्टर जंगल विकसित करण्यात येणार आहे. जंगल विकसित करण्याचे काम वन विभागाला देण्यात आले आहे. वन विभाग जंगल विकसित करतांना जेवढया वृक्षांची जागवड करेल. त्यातील ८० टक्के वृक्षांचे संवर्धन करण्याची जबाबदारी महापालिकेवर असणार आहे. जंगलाच्या आधारे शहरात वनपर्यटनाची संकल्पना तयार करण्यात आली असून त्या अनुषंगाने वन विभाग आणि तज्ञांच्या मदतीने या जंगलात हरीण पार्क आणि पक्षी उद्यान तयार केले जाणार आहे. त्यामुळे वसईतील पर्यटकांमध्ये वाढ होण्याबरोबरच शहराच्या पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.

**सामाजिक वनीकरण.**

- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता दुतर्फा ठीकाणी २०१२ -१३ या वर्षात २०५०० इतकी वृक्ष लागवड करणेत आली आहे.
- संपुर्ण शहरात ३,०६,४१४ इतकी वृक्ष लागवड करणेत आली असुन सदर वृक्ष लागवडीअतर्गत शहरातील दुभाजकांचे सुशोभिकरण करणेत आले आहे.
- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील शिरगांव, चंदनसार व कणेर कंपार्टमेंट क्र.११३० व ११३१ मधील **१२५ हेक्टर वनजमिनीवर** त्रिपक्षीय करारांतर्गत सन २०१२-१३ मध्ये **१,७०,०००** इतकी वृक्ष लागवड करणेत आली आहे.
- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील २५० हेक्टर राखीव वनक्षेत्रावर त्रिपक्षीय करारांतर्गत **FDCM (Forest development corporation of maharashtra**) यांचेमार्फत वृक्ष लागवड करणेचे योजिले असुन **सन २०१७** चे पावसाळ्यात सदर राखीव वनक्षेत्रापैकी शिरगांव डोंगरी मधील ५० हेक्टर वनजमिनीवर ५५५५५ इतकी वृक्ष लागवड करणेत आली आहे. सदर वृक्षांचा संगोपन कालावधी ७ वर्षे आहे.
- सन २०१८ चे पावसाळ्यात त्रिपक्षीय करारांतर्गत FDCM (Forest development corporation of maharashtra) यांचेमार्फत उर्वरीत २०० हेक्टर राखीव वन क्षेत्रापैकी निश्चित होईल अशा ५० हेक्टर वन क्षेत्रावर ५५,५५५ इतकी वृक्ष लागवडीचे नियोजन करणेत आले आहे. व सदर वृक्षांचे संगोपन ७ वर्षे पर्यंत केले जाणार आहे.
- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वृक्षांची गणना करणेत आली असुन सदर अहवालानुसार महानगरपालिका हद्दीत एकूण १४,१४,४६२ इतके वृक्ष आहेत.
- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील **दुभाजके देखभाल करणेकरीता** तसेच नवीन दुभजके सुशोभीकरण करणेकरीता ३ वर्षे कालावधीसाठी (२०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१) निविदा मागविणेत येत आहे. यामार्फत शहरात नव्याने तयार होणारे दुभाजक व वाहतुक बेटे सुशोभित करणेत येतील.
- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील **उद्याने सुशोभीकरण व देखभाल करणेकरीता** ३ वर्षे कालावधीसाठी (२०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१) निविदा मागविणेत येत आहे. यामार्फत शहरातील उद्याने हिरवळ (लॉन),शोभिवंत झाडे व झुडपे लावुन सुशोभित करणेत येतील.

❖ **शहरातील आरक्षित जागेवर वृक्ष लागवड** करणेबाबत वृक्ष संख्या निश्चितीची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे शहरातील इतर आरक्षित जागेची पाहणी करुन माहिती संकलित करणेची कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही झालेनंतर एकूण वृक्ष लागवड संख्या निश्चित होईल.

**विजेची बचत** : दैनंदिन जिवनात वीज हा महत्वाचा घटक आहे त्यामुळे विजेची बचत करणे ही देखील काळाची गरज असून वीज निमिर्तीसाठी लागणा-या इंधनाची बचत करणे म्हणजेच राष्ट्रीय संपत्तीची, पर्यायाने पर्यावरणाची होणारी हानी थांबवणे होय. नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये सौर ऊर्जा ही कधीही न संपणारी संपत्ती आहे. भविष्यात सौर ऊर्जेच्या वापरात वाढ करणे म्हणजे पर्यावरणाला एक प्रकारे हात भार लावण्यासारखे आहे. महाराष्ट्र उर्जा विकास महामंडळ अर्थात महाऊर्जा या संस्थेतै राज्यात उर्जा निर्मिती, उर्जा साधनांचा वापर व त्यासाठी अनुदान योजना, ऊर्जास्त्रोत निर्मितीच्या ठिकाणांचा शोध निरिक्षण आदी योजना राबविल्या जातात. महानगरपालिकेच्या अखत्यारितील पाणी पुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये उर्जा बचतीसाठी सयंत्रे बसविण्याबरोबर महाउर्जातर्फे महानगरपालिकेच्या इमारतीमधील विजेची बचत करण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प नावाची योजना राबविण्यात येते. महाउर्जाच्या या विविध योजनांचा लाभ घेऊन विजेच्या बचतीबरोबरच महापालिकेचा यासाठी होणारा खर्च कमी करणे यामुळे शक्य होऊ शकेल.

**स्त्री भ्रूण हत्या** :- स्त्री भ्रूण हत्येचे वाढते प्रमाण ही आज चिंतेची बाब आहे. भारतासारख्या प्राचीन नि सांस्कृतिक वारसा सांगणाऱ्या देशात स्त्री भ्रूण हत्येसारखे प्रकार व्हावेत हे लांच्छनास्पद आहेत यात शंका नाही. वैज्ञानिक दृष्टया देखील पुरषांबरोबर स्त्रियांच्या जनन प्रमाण समान असणे आवश्यक आहे. स्त्री भ्रूण हत्योमुळे आज स्त्रीयांच्या जन्मप्रमाणात कृत्रिमरित्या घट होत असून त्यामुळे जिवनचक्राचे पर्यावरण ढासळल्याचे दिसून येते, भारत देखाचा एक जागरुक नागरिक या नात्याने या देशाची प्रत्येक लेक वाचविणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी बनली आहे. त्यामुळे स्त्री भ्रूण हत्या थांबवण्यासाठी प्रयतनपुर्वक कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष तरतूद करण्याबरोबरच एकाच मुलीला जन्म देऊन संतती नियमनाची शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या दांपत्याचा देखील गौरव करुन त्यांना प्रोत्साहनपर अनुदान देंण्यात येईल.

**<u>संस्कृतीचे जतन व संवर्धन</u>** :- शहराच्या विविध भागांतील चौक, वाहतूक बेटे, उद्याने येथे देखील विविध जातीधर्माच्या स्थानिक लोकांची ओळख पटविणारी शिल्पे निर्माण करण्यात येतील.

**<u>सन २०१७-१८ मध्ये खाली दर्शविलेले विकास कामे पुर्ण झालेली आहेत.</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विरार (पु.) वैतरणा फणसपाडा येथे बहुउद्देशिय सभागृह. | २ | विरार (पु.) प्रभाग क्र.६ गासपाडा स्मशानभूमी. |
| ३ | नालासोपारा येथील आंबेडकर नगर, पाटनकर पार्क, झालावड मैदान, रानळेतलाव येथे आरोग्य केंद्राचे नुतनीकरण. | ४ | विरार (प.)वॉर्ड क्र.१६ मध्ये स्वर्गीय सी.पी.सोलंकी मैदानात अभ्यासिका व बहुउद्देशिय सभागृह. |
| ५ | प्रभाग क्र. ३ मध्ये चिखलडोंगरी येथे सामाजिक सभागृह. | ६ | वॉर्ड क्र.३४ मध्ये टेपपाडा येथे समाजमंदिर. |
| ७ | वॉर्ड क्र.१५ मध्ये आंबेडकर नगर येथे समाजमंदिर. | ८ | सोपारा येथील भाटेला तलावाचे सुशोभिकरण. |
| ९ | विरार (प.) सर्वे नं.३७९ येथे मार्केट बांधकाम | १० | नालासोपारा पुर्व सर्वोदय नगर येथे माता बाल संगोपन केंद्र व प्रसूतीगृह. |
| ११ | वृंदावन गार्डन येथे बहूउद्देशिय सभागृह. | १२ | नालासोपारा (प.) निर्मळ व वाघोली येथे स्मशानभूमी. |
| १३ | नालासोपारा (प.) येथे स.नं. ३२ खेळाचे मैदान. | १४ | नालासोपारा (पू.) तुळींज हॉस्पीटल येथे आय.सी.यू व दंत चिकीत्सा केंद्र. |
| १५ | वॉर्ड क्र.६३ मध्ये सातीवली आंबेडकर नगर येथे आरोग्य केंद्राची दुरूस्ती व नुतनीकरण. | १६ | वर्धमान नगर तलाव येथे जेष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सभागृह. (मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर यांचे फंडाअंतर्गत) |
| १७ | आचोळे व धानिव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र. | १८ | वर्धमान नगर तलाव येथे उद्यान(मा.आमदार क्षितीजजी ठाकूर यांचे फंडाअंतर्गत) |
| १९ | प्रभाग समिती एफ मध्ये धानिव तलाव. | २० | प्रभाग समिती एफ आचोळे व चांदिप येथे बहुउद्देशिय इमारत. |

२१ स्वच्छ भारत अभियान योजनेअंतर्गत वसई फाटा (हायवे) एव्हरशाईन, तुळीज फॉरेस्ट नाका, नवघर स्टेशन (पुर्व), विरार(पू) वसई गोखीवरे, वालीव व अन्य ठिकाणी पे ॲण्ड युज शौचालयांची बांधकामे.

२२ राज नगर येथे समाजमंदिर.

२३ आचोळे नागेला तलावाचे सुशोभिकरण.

२४ वॉर्ड क्र. १०५ मध्ये जुचंद्र येथील परेरानगर येथील स्मशानभूमी.

२५ वॉर्ड क्र.७७ मध्ये जानकीपाडा येथे पाण्याच्या टाकी जवळ स्मशानभूमी.

२६ वॉर्ड क्र.६१ (नविन ७४) मध्ये धुमाळनगर येथे स्मशानभूमी.

२७ वॉर्ड क्र.७८ (नविन १०५) मध्ये जुचंद्र आरोग्य केंद्राची दूरुस्ती व नुतनीकरण.

२८ वॉर्ड क्र.७३ (जुना) मध्ये दिनदयाळनगर उद्यानात समाजमंदिर.

२९ वॉर्ड क्र.७७ (जुना) मध्ये उमेळमान शिवमंदिराकडे जाणाऱ्या नाल्याचे काम.

३० दिवाणमान स्मशानभूमी.

३१ वॉर्ड क्र.९८ मध्ये बालभवन उद्यान.

३२ प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८५ मधील कोळीवाडा येथील पी.कवळी इमारती लगत उद्यान.

३३ वॉर्ड क्र.१०७ मधील नायगांव वाल्मिकेश्वर तलावाचे सुशोभिकरण. (मा.आ.श्री. हितेंद्रजी ठाकूर यांच्या फंडांअंतर्गत)

**सन २०१७-१८ मध्ये खाली दर्शविलेले विकास कामे सुरु आहेत.**

१ विरार (पू) येथे चंदनसार बहुउद्देशिय इमारत बांधणे.

२ विरार (पू.) अमुल डेअरी ते वैतरणा स्टेशन रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

३ प्रभाग क्र.१७ मध्ये स.नं.४११ मध्ये सांस्कृतीक भवन बांधणे.

४ वॉर्ड क्र.७४ मध्ये सर्वे नं. ६४ मध्ये शहरी बेघरांना रात्र निवारा केंद्र बांधणे.

५ वॉर्ड क्र.३४ नवापूर येथे समाज मंदिर बांधणे.

६ वॉर्ड क्र.१५ आगाशी शंकर मंदिर तलाव सुशोभिकरण करणे.

७ वॉर्ड क्र.१६ राममंदिर तलावास संरक्षक भिंत बांधणे.

८ वॉर्ड क्र.३२ मध्ये परिवहन सेवेसाठी बस डेपो बांधणे.

९ नालासोपारा (प.) लक्ष्मी बेन छेडा मार्ग येथे गार्डन रंगमंच बांधणे.

१० नालासोपारा (प.) स.नं.३२ येथे फिश मार्केट बांधणे.

११ नवघर पुर्व येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नुतनीकरण करणे

१२ नवघर पुर्व येथे अग्निशमन केंद्र इमारत बांधणे

१३ नवघर पुर्व येथे दवाखाना इमारत बांधणे

१४ मजेठिया नाटयगृहस्टेज इमारती समोर बंदिस्त नाटयगृहासाठी शेडचे बांधकाम करणे.

१५ मजेठिया नाटयगृहस्टेज इमारतीचे नुतनीकरण करणे

१६ बिलालपाडा तलाव सुशोभिकरण करणे

१७ वाकणपाडा तलाव सुशोभिकरण करणे

१८ संतोषभुवन तांडापाडा येथील दिपक चौधरी यांच्या घराजवळील तलाव विकसीत करणे.

१९ आचोळे तलाव नुतनीकरण करणे.

२० पेल्हार येथे (नालासोपारा फाटा) अग्निशमन केंद्र इमारत बांधणे.

२१ संतोषभुवन नालासोपारा (पुर्व) येथील नंदु किणी यांच्या घराजवळ तलाव विकसीत करणे.

२२ प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८४ मधील मोठा माळ क्रिडागण विकसीत करणे.

२३ गालानगर येथे वाहतुक बेटे विकसीत करणे (मा. आमदार क्षितीज ठाकूर यांच्या फंडातुन )

२४ मौजे बोळींज आरक्षण क्र. १६२ (प्ले ग्राऊंड) मध्ये क्रिडा संकुल व क्लब हाऊस विकसीत करणे.

२५ वॉर्ड क्र. ६२ (नविन ७५) सातीवली सर्वे नं. ८७ मध्ये तत्कालीन ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे बांधकाम करणे.

२६ वॉर्ड क्र. ७८ (नविन १०५) मध्ये जुचंद्र येथे सर्वे नं.५७१ येथे उद्यान विकसीत करणे.

२७ वॉर्ड क्र.१०५ मध्ये जुचंद्र येथे आरोग्य केंद्राच्या पहील्या मजल्याचे बांधकाम करणे.

२८ वॉर्ड क्र.१०५ मध्ये जुचंद्र स्मशानभूमी मध्ये दहन शेड, गोडावून व इतर कामे करणे.

२९ वॉर्ड क्र. ७६ मध्ये गोलानी नाका येथे बॉक्स कल्व्हर्ट बांधणे.

३० वॉर्ड क्र.९५ मध्ये कौलसिटी येथील आरक्षित जागेवर प्ले-ग्राऊंड तयार करणे.

३१ वॉर्ड क्र.८५ मध्ये ओमनगर उद्यान विकसीत करणे.

३२ प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील उमेळा स्मशानभूमीत दहनशेड व अनुषंगीक कामे करण नुतनीकरण करणे.

३३ मौजे-मोरे नालासोपारा पुर्व येथे रात्र निवारा केंद्र इमारतीचे बांधकाम करणे

३४ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील तामतलाव येथे जलतरण तलाव विकसीत करणे.

३५ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील पापडी तलाव सुशोभिकरण करणे.

३६ प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.८३ मधील चोबारे तलाव सुशोभिकरण करणे.

३७ प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.७२ मधील गिरीज तलाव सुशोभिकरण करणे.

**सन २०१८-१९ मध्ये खालील प्रमाणे विकास कामे करणे प्रस्तावित आहे.**

१ विरार कोशींबे ते कणेर फाटा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे

२ विरार (पू.) वैतरणा स्टेशन ते फणसपाडा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे

३ विरार (पू.) वणवठापाडा तलावाचा विकास करणे.

४ विरार (पू.) प्रभाग क्र. ११ मध्ये साईदत्त झोपडपट्टी येथे आरोग्य केंद्र बांधणे.

५ विरार (पु.) जिवदानी ग्राऊंड येथे इनडोर स्टेडियमचा विकास करणे.

६ विरार (पु.) येथील स.नं. १२६, १२७, १२९ येथील उद्यान विकसीत करणे.

७ विरार (प.) सर्वे नं. ३७६ येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे.

८ प्रभाग क्र.३ व ४ मध्ये नारंगी जेट्टी ते मारंबळपाडा जेट्टी सुशोभिकरण करणे.

९ प्र. क्र.३ मध्ये मारंबळपाडा जेट्टी ते आदर्श शाळेपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

१० प्र. क्र.३ मध्ये भवानी मंदिर ते मारंबळपाडा जेट्टीपर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.

११ वॉर्ड क्र.३५ मध्ये कोफराड तलाव सुशोभिकरण करणे.

१२ वॉर्ड क्र. ११ मध्ये पुरापाडा येथील स्मशानभूमीचा विकास करणे.

१३ वॉर्ड क्र.३३ मध्ये रानपाडा येथील तलाव सुशोभिकरण करणे.

१४ वॉर्ड क्र.३६ मधील बोळीज झाडका स्मशानभूमी विकसीत करणे.

१५ वॉर्ड क्र.३६ मधील रानपाडा येथील स्मशानभूमी विकसीत करणे.

१६ वॉर्ड क्र.३६ मध्ये उमराळे तलाव सुशोभिकरण करणे.

१७ विरार (पू.) उर्दु शाळे जवळील उद्यानाचा विकास करणे.

१८ आगाशी धोबी तलाव विकसीत करणे.

१९ नालासोपारा (पू.) मनवेलपाडा येथे स्मशानभूमीचा विकास करणे.

२० नालासोपारा (प.) निर्मळ येथे मार्केट व बहूउद्देशिय इमारत बांधणें.

२१ मांडवी येथे जिल्हा परिषद शाळेजवळील गार्डनचे सुशोभिकरण करणे

२२ प्र. क्र. ८० मध्ये विद्याविकासीनी शाळे समोरील उद्यान आरक्षण विकसीत करणे

२३ प्रभाग क्र. ८७ मध्ये होली फॅमिली शाळे जवळील नाल्यावर मार्केट बांधणे

२४ नवघर येथे बहुद्देशिय इमारत बांधणे

२५ धानिव कातकरी पाडा येथे समाजमंदिर बांधणे

२६ मांडवी तलाव विकसीत करणे

२७ मांडवी स्मशानभुमी नुतनीकरण करणे

२८ काशिद कोपर तलाव विकसीत करणे

२९ खैरपाडा येथे स्मशानभुमी विकसीत करणे

३० बिलालपाडा कार्यालय इमारतीचे नुतनीकरण करणे.

३१ वॉर्ड क्र.७५ मध्ये सातीवली स्मशानभूमी सुशोभिकरण करणे.

३२ गोखीवरे जानकीपाडा दफनभूमीचा विकास करणे.

३३ वॉर्ड क्र. ८८ मध्ये गोखीवरे फादरवाडी येथे बहुउद्देशिय इमारत बांधणे.

३४ वॉर्ड क्र.६० (नविन ८८) मध्ये भोयदापाडा येथे समाजमंदिर बांधणे.

३५ वॉर्ड क्र.६३ (नविन ९०) मध्ये कोल्ही येथील चिंचोटी ब्रिज ते ज्ञानोदय शाळेपर्यंत आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे.

३६ वॉर्ड क्र.१०५ मध्ये जुचंद्र स्मशानभूमी मध्ये पदपथ तयार करणे व सुशोभिकरण करणे.

३७ वॉर्ड क्र.९१ मध्ये राजावळी तलाव सुशोभिकरण करणे.

३८ वॉर्ड क्र.१०५ मध्ये खोलांडे पाडा येथे समाजमंदिर बांधणे.

३९ वा. क्र.९५ मध्ये चुळणे खलाटीपाडा येथील सुर्यास्त उद्यान विकसीत करणे

४० वॉर्ड क्र. ९५ मध्ये चुळणे खलाटपाडा तलाव विकसीत करणे.

४१ वॉर्ड क्र.७१ (जुना) मधील अग्रवाल सिटी अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे.

४२ वॉर्ड क्र.९७ मध्ये साई नगर येथे हॅप्पी कॅसल इमारती समोरील नाना-नानी पार्क विकसीत करणे.

४३ वॉर्ड क्र.९८ मध्ये समता नगर येथे सागर सरिता उद्यान विकसीत करणे.

४४ वॉर्ड नं.९८ मध्ये समता नगर येथे चिमाजी आप्पा उद्यान विकसीत करणे.

४५ वॉर्ड क्र.१०० मध्ये वीर सावरकर नगर येथे सरदार वल्लभभाई पटेल उद्यान विकसीत करणे.

४६ वॉर्ड क्र.९३ मधील अंबाडी रोड येथील वाचनालयाचे पहिला व दुसरा मजला नुतनीकरण करणे.

४७ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील चिमाजी आप्पा स्मारक परिसरात असलेल्या आरक्षण क्र. ६८९ मध्ये उद्यान विकसीत करणे.

४८ प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील पापडी येथील मौजे धोवली येथील आरक्षण क्र.७०७ वर गार्डन विकसीत करणे.

४९ वॉर्ड क्र.१०९ मधील पंतनगरी शेजारी उद्यान विकसीत करणे.

५० वॉर्ड क्र.१०९ मधील पापडी येथील चणेबारी नाका येथे उद्यान विकसीत करणे.

५१ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वसई नर्सरी बाग येथे अग्निशमक केद्र बांधणे.

५२ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील उमेळा फाटा येथील पापडी औद्योगिक वसाहतीच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ अग्निशमन केंद्र बांधणे.

५३ वॉर्ड क्र.१०९ मधील धुरी बंगलो स्किम शेजारी तलावाचे सुशोभिकरण करणे.

५४ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०८ मधील मोठा माळ तलावाचे सुशोभिकरण करणे.

५५ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०३ मधील उतळेश्वर तलाचाचे सुशोभिकरण करणे.

५६ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०३ मधील बरमाळे तलावाचे सुशोभिकरण करणे.

५७ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील सर.डी.एम.पेटीट रुग्णालयातील विविध आवश्यक कामे करणे.

५८ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील मालोंडे येथील ख्रिस्ती समाज दफनभूमी मध्ये विविध विकास कामे करणे नुतनीकरण करणे.

५९ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील पापडी स्मशानभूमीचे नुतनीकरण करणे.

६० प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०३ मध्ये नवापाडा आदिवासी वसाहत शेजारच्या स्मशानभूमीचा विकास करणे.

६१ प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०३ मध्ये सालोली हिंदू स्मशानभूमीत विविध विकास विषयक कामे करणे.

६२ वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यावर माणिकपूर नाका/गोखीवरे/पंचवटी/बोळींज वैगेरे ठिकाणी उड्डाणपुलाची बांधकामे करणे.

६३ विरार (पू.) येथे पश्चिमेकडे जाण्यासाठी रॅम्प ब्रिज चे बांधकाम करणे.

६४ विरार / नायगाव दरम्यान पुर्व/पश्चिम रेल्वे उड्डाणपुलाची बांधकामे करणे.

६५ वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात भव्य नगर वाचनालयाची उभारणी करणे.

६६ वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात कत्तलखान्याचे (Slaughter house) चे बांधकाम करणे.

६७ वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात कोंडवाडा बांधकाम करणे.

६८ विरार/नालासोपारा पुर्व/पश्चिम जोडणाऱ्या ब्रिजला लिफ्ट/ एस्केलेलेटर ची सुविधा करणे.

६९ Pipe Gas - महानगरपालिका क्षेत्रात गॅस पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरु करावी अशी माझी सुचना आहे.

- Bike Ambulance - महानगरपालिका क्षेत्रातील गल्ली बोळात वैद्यकिय सेवा पुरविणेसाठी Bike Ambulance सेवा सुरु करणेचा माझा मानस आहे.
- L.E.D. Street Light Outsourcing - शहरातील सद्याची दिवाबत्तीची देखभाल व्यवस्था खाजगी ठेकेदारामार्फत करुन एल.ई.डी. बल्बद्वारे दिव्याची व्यवस्था केल्यास विज वापरावरील खर्च कमी होईल.

- E-Bus - Battery Operated Buses - सद्या पेट्रोल डिझेल वापरामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबतचा विचार करता महानगरपालिकेने ई-बस सर्विस सेवेअंतर्गत बॅटरी ऑपरेटेड बसेस महानगरपालिका परिवहन सेवेच्या ताफ्यात दाखल कराव्यात अशी माझी सुचना आहे.

वरीलकामी महानगरपालिका प्रशासनाने आवश्यक त्या कार्यवाहीचा अभ्यास करुन प्रस्ताव सादर करावेत अशी माझी सुचना आहे.

असा हा **सन २०१७-२०१८ प्रारंभिक शिल्लक रु. ३७६ कोटी ६१ लक्ष, जमा रु. १३५९ कोटी ७४ लक्ष व खर्च १५३४ कोटी ७० लक्ष च्या सुधारीत अर्थसंकल्पासह व सन २०१८-१९ प्रारंभिक शिल्लक २०१ कोटी ६५ लक्ष, जमा रु. १६६५ कोटी ७० लक्ष व खर्च १७१७ कोटी ७२ लक्ष आणि १४९ कोटी ६३ लक्ष शिल्लकेचे असे एकूण १८६७ कोटीचा ३५ लक्ष रकमेचे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक** सर्वसमावेशक बहुजनांच्या प्रगतीचा, विकासाचा अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर यांचे मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, मा. गटनेते, मा स्थायी समिती सदस्य, मा. महिला बाल कल्याण समिती सभापती, मा. परिवहन समिती सभापती, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती, मा. आयुक्त व त्यांचे सहकारी, नगर सचिव व त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून "प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास" हे महानगरपालिकेचे ब्रीदवाक्य सार्थ होईल याची मला खात्री आहे त्यासाठी आपण सर्व प्रयत्न करुया.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असून ही संधी लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब,

मा. प्रथम महिला महापौर महोदया, सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम, मा. महापौर श्री. रुपेशजी जाधव साहेब. मा. उपमहापौर श्री. प्रकाशजी रॉड्रीग्ज साहेब. माजी उपमहापौर मा. श्री. उमेशजी नाईक साहेब, सर्व आजी माजी पदाधिकारी व माझे मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली याबद्दल मी या सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

मा. स्थायी समितीने मंजूर केलेला अ व क अर्थसकंल्प तसेच परिवहन समिती ब अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, विशेष निधी अंदाजपत्रके व कर्ज निधी अंदाजपत्रक मंजुर करणेस आपणांस विनंती आहे.

धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(अफिफ जमिल शेख)
सभापती
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका